# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१२७९/२०२२/अहिल्यानगर**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. मच्छिंद्र मोहनीराज थोटे<br>रा. सदाशिव नगर, नेवासा खु.,<br>ता. नेवासा, जि. अहिल्यानगर | महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. | तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर. |

**सुनावणी दिनांक –२३/०७/२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | ऑनलाईन उपस्थित | अनुपस्थित | ऑनलाईन उपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : २८/०२/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार यांनी लेखी सुचना देऊन ही माहिती अधिकारी यांनी मला पाहिजे ती माहिती दिली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २५/०८/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०६/०९/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : ७ दिवस

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** वार्ड नं. १ मध्ये माझे कुपन असुन अन्न सुरक्षा योजनेचा मी लाभार्थी आहे किंवा नाही याची माहिती मिळणे बाबत.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा, यांनी दि. १४/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे दिनांक ०६/०७/२०१९ रोजीचे शासन निर्णयान्वये दिनांक ३०/०६/२०१९ पर्यंतच्या योग्य व गरजु असलेल्या पात्र शिधापत्रिकाधारकांचा विचार करण्यात यावा. असे कळविलेले आहे. सोबत सदर शासन निर्णयाची प्रत आपले माहीतीस्तव जोडलेली आहे. असे अपिलार्थी यांना कळविले असल्याचे दिसून येते.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०१/१०/२०२१

(२) प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०८/१०/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : प्रथम अपिलात दिलेली माहिती मुद्देसुद व माहिती अधिकार अर्जास अनुकुल नाही व मला हवीतीच माहिती देण्यात यावी.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा, यांनी दि.१६/१२/२०२१ आदेश पारित करुन त्यामध्ये अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा यांनी शोध घेऊन उपलब्ध असल्यास अपिलार्थी यांना ३० दिवसाच्या आत मोफत उपलब्ध करुन द्यावी असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आले असल्याचे दिसून येते.

५. युक्तीवाद/लेखी खुलासा –

- **तत्कालीन जन माहिती अधिकारी** – यांनी लेखी खुलासा सादर केला असून त्यामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदार श्री. मच्छिंद्र मोहिनीराज थोटे यांचा दिनांक २५/०८/२०२१ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झालेला होता. अर्जदार यांनी वॉर्ड क. १ मध्ये माझे कुपन असून अन्नसुरक्षा योजनेचा मी लाभार्थी आहे किंवा नाही याबाबतची माहितीची मागणी केलेली होती. त्यानुषंगाने या कार्यालयाकडील पत्र क्र. कावि/पुरवठा/१९३/२०२१ दिनांक १४/०९/२०२१ अन्वये अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे दिनांक ०६/०७/२०१९ रोजीचे शासन निर्णयान्वये दिनांक ३०/०६/२०१९ पर्यंतच्या योग्य व गरजू असलेल्या पात्र शिधापत्रिकाधारकांचा विचार करण्यात यावा असे शासन निर्णयात नमुद केलेले आहे. त्या शासन निर्णयाची प्रत जोडून अर्जदार यांना देण्यात आलेली आहे. (सोबत अर्जदार यांना दिलेले पत्र व नमुद शासन निर्णय प्रत असे)

  अर्जदार श्री. मच्छिंद्र मोहिनीराज थोटे यांनी दिनांक ०१/१०/२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार नेवासा यांचेकडेस प्रथम अपिल दाखल केलेले होते. त्यानुषंगाने या कार्यालयाकडून क्र. अपील/कार्य/२१/२०२१ दिनांक ११/१०/२०२१ अन्वये अर्जदार यांना नोटीस देवून अपिल अर्जाची दिनांक २५/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. सुनावणी कामी नोटीस आलेली होतो परंतु अपीलार्थी सुनावणीस गैरहजर असल्याने पुन्हा दिनांक ०१/११/२०२१ रोजी नोटीस काढून दिनांक २२/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता हजर राहणे बाबत कळविणेत आलेले होते, परंतु अपिलर्थी सुनावणीस गैरहजर होते. तद्नंतर पुन्हा दिनांक २९/११/२०२१ रोजी नोटीस काढून दिनांक १३/१२/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता हजर राहणे बाबत कळविणेत आलेले होते, परंतु अपिलार्थी सुनावणीस गैरहजर होते. अशा एकूण ३ नोटीसा काढूनही अपीलार्थी गैरहजर राहिलेले आहेत व त्याबाबत दिनांक १६/१२/२०२१ रोजी निकाल देण्यात आलेला आहे. (सोवत अर्जदार यांना काढलेल्या एकूण ३ नोटीसा व रोजनामा प्रत जोडली आहे.)

  प्रथम अपिलामध्ये दिनांक १६/१२/२०२१ रोजी अंतिम निकाल पारीत करणेत आलेला असून अपिलार्थी याचे अपील अंशतः मान्य करण्यात आलेले असून अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती जनमाहिती अधिकारी तथा महसुल नायब तहसिलदार नेवासा यांनी शोध घेवून उपलब्ध असल्यास अपिलार्थी यांना ३० दिवसाचे आत पुरविण्यात यावे असे आदेशित करणेत आलेले आहे. सोबत निकालाची प्रत असे. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा महसुल नायब तहसिलदार, नेवासा यांनी या कार्यालयाकडील पत्र क. कावि/पुरवठा/३४२/२०२२ दिनांक ३०/०८/२०२२ अन्वये अर्जदार यांना माहिती पुरविणेत आलेली आहे. त्याबाबत अपिलार्थी यांची स्वाक्षरीची छायांकित प्रत स्वाक्षांकित करुन सोबत जोडलेली आहे. तसेच अपिलार्थी यांनी आपलेकडेस दिनांक २८/०२/२०२२ रोजी दाखल द्वितीय अपीलाचे अनुषंगाने दिनांक ३०/०८/२०२२ रोजी माहिती मिळाली असुन माझी काहिएक तक्रार नाही असे अपीलार्थी यांनी लेखी दिलेले आहे. तरी अपिलार्थी यांनी आवश्यक माहिती मिळाली असून सदर बाबत काहीएक तक्रार नसल्याचे लेखी दिलेले असल्याने सदर सदर अपील निकाली काढण्यात यावे ही सविनय विनंती असे.
- **प्रथम अपीलीय अधिकारी** – दिनांक १३/१२/२०२१ रोजी सुनावणी घेऊन दि.१६/१२/२०२१ रोजी आदेश परित केलेले आहेत.

६. निष्कर्ष –

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा महसूल नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा, यांनी अपीलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १४/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये, वस्तुस्थितिदर्शक उत्तर व शासन निर्णयाची प्रत अपिलार्थीस दिली असल्याचे दिसून येते.

(२) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, नेवासा, यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने दि. २५/१०/२०२१ व दि. २२/११/२०२१ , व १३/१२/२०२१ असे तीन वेळेस सुनावणी घेऊन दि.१६/१२/२०२१ रोजी आदेश पारित केला असून त्यामध्ये ३० दिवसाच्या आत मोफत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेशित केले असल्याचे दिसून येते.

(३) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा महसुल नायब तहसिलदार, तहसिल, कार्यालय, नेवासा यांनी प्रथम अपिल निर्णयानुसार दि.३०/०८/२०२२ च्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे दिसून येते.

(४) अपिलार्थी यांनी आयोगास दि.३०/०५/२०२२ रोजीचे लेखी निवेदन सादर केले असून त्यामध्ये असे नमुद केले आहे की, आपलेकडे दि.२८/०२/२०२२ रोजी द्वितीय अपिल अर्ज दाखल केला होता तरी दि.२५/०७/२०२२ च्या पत्रान्वये मला आवश्यक असलेली माहिती प्राप्त झालेली आहे. तसेच माझे रेशनकार्ड प्राधान्य कुटुंब योजनेतील असुन ऑनलाईन कार्ड प्रकार PHH प्राधान्य कुटुंब व त्याचा RC क्रमांक २६२०१८४९८०४० मिळाला आहे त्यामुळे माझी कुठलिही तक्रार राहिली नसुन माहिती अधिकारात दिलेला अर्ज निकाली काढण्यात माझी कुठलिही हरकत नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१२७९/२०२२/अहिल्यानगर निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ८८२० 19 NOV 2025